**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक ११ एप्रिल २०२६**

**ठळक बातम्या**

1. **थोर समाजसेवक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त देशभरातून अभिवादन, राज्यात विविध कार्यक्रमांचं आयोजन.**
2. **शालेय बसचे शुल्क प्रादेशिक वाहतूक प्राधिकरणाच्या माध्यमातून निश्चित करण्याचा राज्य सरकारचा प्रस्ताव.**
3. **यवतमाळ जिल्ह्यातील पुसद, वसंतनगर तसेच आसपासच्या परिसरात भूकंपाचे सौम्य धक्के.**
4. **दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, नागपूर मंडळाकडून उन्हाळी सुट्टीतील अतिरिक्त गर्दीसाठी विशेष गाड्या.**

-----------------------------------------------

म.फुले द्विशताब्दी जन्मवर्ष

थोर समाजसेवक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त देशभरात त्यांना आदरांजली वाहिली जात आहे. संसद भवनात प्रेरणा स्थळी राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू, उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभा सभापती ओम बिर्ला आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि अन्य मंत्र्यांनी फुले यांना आदरांजली वाहिली. राज्यात लोकभवन इथे राज्यपालांनी महात्मा फुले यांना अभिवादन केलं. विधान भवनातही महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या २००व्या जयंतीनिमित्त ,त्यांचं गाव खानवडी इथे अभिनव जिल्हा परिषद शाळा सुरु करणे ही त्यांच्या कार्याला खरी मानवंदना ठरेल असं राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. पुण्यात खानवडी इथे ज्योती सावित्री जिल्हा परिषद शाळेचं उदघाटन आणि लोकार्पणआज झालं त्यावेळी ते बोलत होते. या शाळेच महत्व त्यांनी अधोरेखित करतांना ते म्हणाले.

***(होल्ड बाईट - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस 45 सेकंद)***

यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रापवार, मंत्री छगन भुजबळ, चंद्रकांत पाटील,आदी मान्यवर उपस्थित होते. पुणे महापालिकेने आज१०० अटल टिंकरिंग लॅब्जचे उदघाटन केलं

आहे. तसेच राज्याच्या कौशल्यविकास विभागाने आजच एका कौशल्य प्रशिक्षण केंद्राचे उदघाटन केलं असून सरकार अशा प्रकारची १ हजार केंद्रं उभारणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी यावेळी जाहीर केलं. दिवंगत उपमुख्यमंत्रीअजित पवार यांनी २०२२ साली या शाळेची पायाभरणी केली होती. सरकारआणि खाजगी कंपन्यांच्या देणग्यांमधून या शाळेचं बांधकाम पूर्ण झालं आहे.2027 हे द्विशताब्दी वर्ष राज्यात उत्साहात साजरं करण्याचा निर्णय राज्य शासनानं घेतला आहे. या अनुषंगानं शालेय शिक्षण विभाग आजपासून पुढच्या वर्षी १० एप्रिलपर्यंत राज्यातल्या सर्व शाळांमध्ये विविध शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रम राबवणार आहे. सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयं तसंच सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये महात्मा फुले यांच्या प्रतिमेचं पूजन करून या उपक्रमाची सुरुवात झाली. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय रुजवण्यासाठी शाळांमध्ये वाचनालयं ज्ञानकेंद्र म्हणून विकसित केली जाणार आहेत. तसेच फुले यांच्या विचारांवर आधारित व्याख्याने, वेबिनार, परिसंवाद आणि चर्चासत्रांचं आयोजन करण्यात येणार आहे. नागपूर महावितरणसह, शाळा महाविद्यालय, सरकारी, निमसरकारी आणि इतर संस्था याठिकाणी जयंती साजरी करण्यात आली. अकोला इथं अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीनं जयंती महोत्सवाचं आयोजन केलं होतं. बुलढाणा जिल्ह्यातल्या जळगाव जामोद पंचायत समितीनं महात्मा फुलेंच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन केलं होतं.

-----------------------------------------------

प्रताप सरनाईक

शालेय बसचं शुल्क प्रादेशिक वाहतूक प्राधिकरणाच्या माध्यमातून निश्चित करण्याचा प्रस्ताव राज्य सरकारनं सादर केला आहे. यानुसार पालकांकडून केवळ मासिक शुल्क घेतलं जाईल, एकरकमी आगाऊ रक्कम घ्यायला सरकारनं मनाई केली आहे. मोटार वाहन कायद्याच्या अंतर्गत परिवहन विभागानं शालेय बस नियमनाच्या संदर्भात अधिसूचना जाहीर केली आहे. त्यात हे नमूद केलं आहे. बसमधला विद्यार्थी किती वाजता आला आणि किती वाजता उतरला, या वेळेसह त्याची दैनिक उपस्थिती नोंद बंधनकारक करण्यात आली आहे. पाचवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची ने-आण करणाऱ्या वाहनात महिला परिचारिका आवश्यक असणार आहे.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक वाहनात ,डिजिटल सेफ्टी मॉनिटरिंग सिस्टम बसवणे आवश्यक असेल. या प्रणालीद्वारे वाहनाचं लाईव्ह ट्रॅकिंग, डिजिटल उपस्थिती नोंद, स्वयंचलित अलर्ट आणि पालकांना थेट माहिती मिळणार आहे.

राज्यस्तरीय प्लॅटफॉर्मशी या प्रणालीचं एकत्रीकरणही करण्यात येणार आहे. सर्व शालेय बस आणि व्हॅनमध्ये GPS-आधारित Vehicle Location Tracking Device, पॅनिक बटण, अग्निसुरक्षा यंत्रणा, CCTV तसचं सर्व सीट्ससाठी सीट बेल्ट सक्तीचे आहे. बस चालक, वाहक आणि इतर कर्मचाऱ्यांची पार्श्वभूमी तपासणी, वैद्यकीय प्रमाणपत्र आणि अधिकृत नियुक्तीपत्रही सरकारनं अनिवार्य केलं आहे.

-----------------------------------------------

'पीएनजी'

राज्य शासनानं शहर गॅस वितरण कंपन्यांना २४ तास कार्यरत राहणारी हेल्पलाइन सुरू करण्याचे आणि पाईपद्वारे पुरवल्या जाणाऱ्या नैसर्गिक वायूच्या अर्थात 'पीएनजी' जोडण्यांसाठीचे अर्ज हाताळणाऱ्या केंद्रांची संख्या वाढवण्याचे निर्देश दिले आहेत. पश्चिम आशियातील संघर्षामुळे निर्माण झालेल्या जागतिक ऊर्जा पुरवठा संकटाच्या पार्श्वभूमीवर हे पाऊल उचलण्यात आलं आहे. अन्न आणि नागरी पुरवठा विभागाने कंपन्यांना, संपूर्ण राज्यात 'पीएनजी'ची व्याप्ती अधिक विस्तृत करण्यासाठी आपला आवाका तसंच पायाभूत सुविधांचा विस्तार करण्याचे निर्देश दिले आहेत.

-----------------------------------------------

केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालय सचिव

मुंबईत एन एफ डी सी अर्थात राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळाला केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव चंचल कुमार यांनी आज भेट देत इथल्या कामांचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी महामंडळाच्या प्रांगणात वृक्षारोपणही केलं. त्यानंतर त्यांनी भारतीय राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाला भेट दिली. वेव्हज २०२५ सारख्या जागतिक माध्यम उपक्रमांमधल्या भारताच्या सहभागातून घेतलेल्या घटकांबाबत तसंच संग्रहालयाच्या विकासाबाबत अधिकाऱ्यांनी त्यांना माहिती दिली. कुमार यांनी एन एफ डी सी प्रांगणातल्या आय.आय.सी.टी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी मधल्या सुविधांचाही यावेळी आढावा घेतला.

-----------------------------------------------

भूकंपाचे सौम्य धक्के

आज हिंगोली जिल्ह्यात रिश्टर स्केलवर 4.7 तीव्रतेचा भूकंप नोंदविण्यात आला. या भूकंपाचे सौम्य धक्के यवतमाळ जिल्ह्यातील पुसद, वसंतनगर तसच आसपासच्या परिसरात जाणवले आहेत. प्राथमिक माहितीनुसार, या भूकंपामुळे यवतमाळ जिल्ह्यात कोणतीही जीवित किंवा मालमत्तेची हानी झालेली नाही. संबंधित

यंत्रणांकडून परिस्थितीवर सतत लक्ष ठेवण्यात येत असून, नागरिकांनी घाबरून न जाता शांतता राखावी, असं आवाहन प्रशासनामार्फत करण्यात येत आहे. आपत्ती व्यवस्थापन विभाग, महसूल प्रशासन व स्थानिक यंत्रणा सतर्क असून कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तात्काळ प्रतिसाद देण्यासाठी सज्ज आहेत. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये व अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवावा. भूकंपाचे धक्के जाणवल्यास सुरक्षित ठिकाणी जावे, इमारतीबाहेर मोकळ्या जागेत उभे राहावे व आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असं प्रशासनाव्दारे सूचित करण्यात येत आहे.

-----------------------------------------------

दक्षिण पूर्व मध्य रेल्वे

दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, नागपूर मंडळाकडून उन्हाळी सुट्टीतील अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन दक्षिण पूर्व मध्य रेलवे अंतर्गत इतवारी-मालदा टाउन दरम्यान समर स्पेशल ट्रेन क्रमांक (08871 आणि 08872) सुरू करण्यात आली आहे. ही विशेष गाडी 19, 20 व 26 एप्रिल रोजी इतवारीहून तसेच 20, 21 व 27 एप्रिल रोजी मालदा टाउनहून अशी एकूण 3-3 फेऱ्यांसाठी धावणार आहे. गाडी रायपूर, बिलासपूर, राऊरकेला, टाटानगर आणि खडगपूरसह विविध महत्त्वाच्या स्थानकांवर थांबणार आहे. या गाडीत एकूण 20 डबे असून त्यात सामान्य, शयनयान व वातानुकूलित श्रेणीचा समावेश आहे. प्रवाशांनी या विशेष गाडीचा लाभ घ्यावा व प्रवासासाठी आगाऊ आरक्षण करावे, असे आवाहन रेल्वे प्रशासनाने केलं आहे.

-----------------------------------------------

पशुसंवर्धन

Indian Institute of Management Nagpur आणि महाराष्ट्र पशुसंवर्धन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला.६ ते १० एप्रिल दरम्यान झालेल्या या उपक्रमात ३५ अधिकाऱ्यांना दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन व शेतीपूरक क्षेत्रातील धोरणात्मक नियोजनाचे प्रशिक्षण देण्यात आले.

-----------------------------------------------

आयपीएल

आयपीएल क्रिकेटमध्ये आज पंजाब किंग्सचा सामना सनराइजर्स हैदराबादशी चंदिगढमध्ये पीसीए क्रिकेट स्टेडियमवर सुरु असून, सनराइजर्स हैदराबादने पंजाब किंग्जसमोर 220 धावांचे लक्ष्य ठेवल आहे. सनराइजर्स हैदराबादकडून फलंदाजी

करतांना अभिषेक शर्मा याने 78 धावा केल्या, तर पंजाब किंग्जच्या गोलंदाज अर्शदीप सिंग आणि शशांक सिंग यांनी प्रत्यकी 2 गडी बाद केले. सध्या पंजाब किंग्जचे फलंदाज  प्रियांश आर्या आणि प्रभीसिमरन सिंग धावपट्टीवर खेळत आहेत. आजचा दुसरा सामना चेन्नई सुपर किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्समध्ये होणार असून, हा सामना चेन्नईमध्ये एम ए चिदंबरम स्टेडियमवर आज संध्याकाळी साडेसात वाजता सुरु होणार आहे.

---------------------------------------------------

हवामान

येत्या १५ एप्रिल पर्यंत हवामान कोरडं राहणार असल्याचा अंदाज नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागानं वर्तवला आहे. दरम्यान आज अकोला जिल्ह्यात तापमान ४० अंश  सेल्सियस इतका नोंदविण्यात आलं. नागपुरात ३७.४ अंश सेल्सियस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली.

---------------------------------------------------